Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ‘स्वा.रा.ती.म.विद्यापीठातील विघार्थ्यांचे स्वॉट तंत्राद्वारे मुल्यमापन करुन त्यांना मार्गदर्शन आणि समुपदेशनाची आवश्यकतेचा अभ्यास’

**डॉ.सुनिता वाय.पाटिल**
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

**सारांश** :-

*प्रस्तुत संशोधनामध्ये स्वा.रा.ती.म. विद्यापीठतील उच्च शिक्षण घेणा�या विघार्थ्यांचे व्यक्तिमत्व जाणुन घेण्यासाठी स्वॉट तंत्राद्वारे त्यांचे स्वयंमुल्यमापंन करुन घेण्यात आले. प्रश्नावली भरुन घेऊन विघार्थ्यांचे गुण दोष जाणुन घेतले. संशोधनात संशोधनाची गरज, महत्व, उद्दिष्ट,गृहिते व मर्यादा ठरविण्यात आले. संशोधनाची पद्धती ,नमुना निवड ठरविण्यात आले. प्रश्नावली भरुन, मुलाखत घेऊन निष्कर्ष काढण्यात आले.*

**प्रस्तावना** :-

व्यवसाय जगतातुन गुणवता विकासासाठी ही पध्दती शिक्षण क्षेत्राकडे आलेली आहे. काळाच्या ओघात शिक्षणाकडुन अपेक्षा बदलत आहे. युनिस्कोच्या अनुसार शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळविणे नव्हे तर कौशल्यावर प्रभुत्व मिळवुन समाजात स्वतःचे वेगळे असे अस्तित्व निर्माण करणे असे आहे. शिक्षणातुन मुलभुत मानवी गरजांची पुर्तता होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व कौशल्यांचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय मानले आहे. सर्व कौशल्यांचा विकास जर करायचा असेल तर आपली सर्व बाजूने विचार करावा लागेल त्यासाठी Swot Analysis ची आवश्यक आहे.

Swot म्हणजे काय? तर, S = strengths शक्तिस्थाने , w = Weekness कमकरता , O = opportunities संधी , T =Threats समस्या.

व्यक्तिने स्वतःचे मुल्यामापन करुन आपल्या मध्ये काय गुणक्षमता आहे, याचा विचार करुन, त्याचा वापर कसा करता येईल हे बघावे. आपली शक्तिस्थाने बळकट करावी. आपल्यामधील कमतरता ओळखून त्या कमतरता दुर करण्याचा प्रयत्न करावे.

ज्यावेळी व्यक्तीला गुण दाखवण्याची संधी मिळेल, तेव्हा त्या संधीचा फायदा घ्यावा. तेव्हाच यश मिळेल.आपल्यामधील असणा-या गुण व दोषांमुळे कोणकोणते धोके उदभवु शकतात हे जर समजले तर स्वप्रतिमा अबाधित राखण्या -साठी मानसिक व भावनिक संतुलन ठेवता येईल.

**संशोधनाची गरज** :-

१) उच्च शिक्षण घेणा-या विघार्थ्यांचे शक्तीस्थान बळकट करण्यासाठी आवश्यक आहे.
२) विघार्थ्यांच्या अंतर्गत कमतरता जाणुन घेण्यासाठी आवश्यक आहे.
३) विघार्थ्यांनां भविष्यात येणा-या संधीचा फायदा कसा करुन घ्यावा यासाठी मदत.
४) विघार्थ्यांना त्यांच्या कमतरतामुळे येणा-या समस्या टाळण्यासाठी उपयोगी
५) व्यक्तीमत्व विकासासाठी स्वॉट पृथ्थकरणाची गरज आहे.
६) विघार्थ्यांच्या समस्या दुर करण्यासाठी मार्गदर्शन आणि समुपदेशनाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्व** :-

१) उच्च शिक्षण घेणा-या विघार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यास मदत मिळेल.
२) योग्य व्यवसाय निवडीसाठी स्वतःची कुवत, आवड क्षमता, वृत्ती, कमतरता व बलस्थाने याची जाणीव निर्माण करण्यास मदत करणे.
३) स्वतःच्या क्षमता व कौशल्ये यांची व्यवसायातील गरजांशी जुळणी करण्यासाठी विघार्थ्याला मदत करण्यास.
४) शिक्षण व व्यवसाय त्यासंबंधी चिकित्सक रितीने विचार करण्याची कुवत प्राप्त करण्यास मदत करण्यास

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) स्वॉट तंत्रद्वारे विघार्थ्याचे शक्तीस्थाने जाणुन घेणे.
२) विघार्थ्यांच्या कमतरता जाणून घेणे.
३) विघार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन आणि त्यांच्या समस्यांसाठी समुपदेशनाच्या आवश्यकतेचा अभ्यास करणे.

**संशोधनांची गृहीतके** :-

१) विघार्थांमध्ये काही शक्तिस्थान कमतरता असतात .
२) विघार्थांना शैक्षणिक मार्गदर्शन आणि त्यांच्या समस्या दुर करण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकतेची गरज आहे.

**संशोधन पध्दती** :-माहिती संकलनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. नमुना निवड - विद्यापीठातील वर्ष 2014 - 2015 मधील 150 विघार्थी संख्या.

**संशोधनांची साधने** :- विघार्थी प्रश्नावली, मुलाखती ,तथ्यांच्या विश्लेषणासाठी शेकडेवारी पध्दती घेतली आहे.

**तथ्यांचे / माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन** :

विघार्थ्यांच्या गुण व दोषाची यादी असलेला तक्ता

| शक्तीस्थाने | | कमतरता | |
|---|---|---|---|
| १ | आशावादी | १ | संवेदनशील |
| २ | सहकार्याची वृती | २ | अस्थिर मन |
| ३ | उत्साही | ३ | आळशी |
| ४ | संयमी | ४ | निराशा |
| ५ | शांत व समाधानी | ५ | विषम समायोजन |
| ६ | नेतृत्व क्षमता | ६ | भावुक |
| ७ | समुह व्यवस्थापन | ७ | तणाव ग्रस्त |
| ८ | व्यवहारीक ज्ञान | ८ | दुःखी |
| ९ | निर्णय क्षमता | ९ | चिंता |
| १० | संवाद कौशल्य | १० | असुरक्षितेची भावना |
| ११ | बहिर्मूखी | ११ | अंतर्मुखी |
| १२ | जिद्द व चिकाटी | १२ | परावलंबी |
| १३ | वास्तववादी | १३ | कल्पनेत रमणारे |

Vol - IV Issue-IV APRIL 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | स्वतंत्र विचार | | |
| **संधी** | | **समस्या** | |
| **सर्व स्पर्धा परिक्षेत सहभाग घेता येईल, Mpsc, Upsc च्या परिक्षा देता येईल.<br>नेट , सेट , पेटच्या परिक्षा देता येइल, खाजगी किंवा सरकारी नौक-या इ.** | | अपयश संघर्षीत जीवन, चिंता, तणाव, शारिरीक व मानसिक आजार इ. | |

**तक्ता क्र .१**चे अर्थनिर्वचन : विघार्थ्यामध्ये सर्वात जास्त गुणांच्या प्रमाण आशावादी, सहकार्याची वृत्ती, व्यवहारिक ज्ञान आहे. संवाद कौशल्य आहे. वास्तववादी व स्वतंत्र विचाराचे आहे.

**तक्ता क्र .२**चे अर्थनिर्वचन : विघार्थ्यांमध्ये सर्वात जास्त दोषाचे प्रमाण भावूक, संवेदनशील , तणावग्रस्त, आर्थिक बाबतीत परावलंबी आहे.

**तक्ता क्र .३**चे अर्थनिर्वचन : एकूण विघार्थी संख्यामध्ये शेकडाप्रमाण ५४ टक्के विघार्थ्यांनी स्पर्धा परिक्षा दिल्या आहेत. मुलाखतीचे अनुभव घेतले आहे. विघार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व्यवसाय क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.

**तक्ता क्र .४**चे अर्थनिर्वचन : विघार्थ्यांमधील गुणदोषामुळे त्यांना त्यांच्या जीवनात अनेक समस्या उदभवल्या आहेत.

**संशोधनाचे निष्कर्ष** :

१) विघार्थ्यांमध्ये गुण व कमतरता आहेत.
२) गुणक्षमता जास्त असणा-या विघार्थ्यांना त्यांच्या व्यवसाय क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.
३) विघार्थी स्पर्धा परिक्षा देण्याचे प्रमाण जास्त आहे.
४) विघार्थ्यांना मुलाखतीमध्ये चांगले - वाईट अनुभव आले.
५) विघार्थ्यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रासंबंधीत योग्य व्यवसाय निवडीसाठी शैक्षणिक व व्यवसायिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.
६) काही विघार्थ्यांमध्ये कमतरता आहे. त्यांना वैयक्तिक समुपदेशनाची आवश्यकता आहे.

**संदर्भग्रंथ सुची** :


१) ह.ना.जगताप - 'शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने नूतन प्रकाशन,पुणे.
२) डॉ.निलीमा सप्रे, प्रा.प्रीती पाटील - 'शिक्षणातील विचार प्रवाह ' - फडके प्रकाशन, कोल्हापूर
३) रोहीणी चितळे - (१९९०) 'आपण मुलांना समजुन घेऊया. '
४) प्रा.बन्सीबिहारी पंडित - (१९९७) 'शिक्षणातील संशोधन '
नुतन प्रकाशन, पुणे
५) डॉ.सुरेश करंदीकर (१९९४) 'शैक्षणिक मानसशास्त्र फडके प्रकाशन, कोल्हापूर
६) जॉन सी.मॅक्सवेल (२०११) 'इंप्रुव्हमेंट १०१ स्वयं सुधारणेसाठी मार्गदर्शक तत्वे '- साकेत प्रकाशन, पुणे